

सोमवार माघ वद्य ११ शके १८२७ म्हणजे १९ फेब्रुवारी १९०६ या शुभदिनी नागपुरातील श्री. बाळकृष्णपंत रायकर यांच्या घरी सौ. लक्ष्मीबाईंना पुत्ररत्न झाले.
आज विजयाएकादशीच्या मुहूर्तावर बाळ जन्मला
मुलाचे नाव 'माधव' ठेवले. लाडाने सारेजण 'मधू' म्हणत.
माधव फार बुद्धिमान होता. वयाच्या ६व्या वर्षी भाऊजींनी त्याला 'रामरक्षास्तोत्र' आणून दिले.
रामरक्षा तुम्हीच वाचा व मी ऐकून पाठ करतो.
भाऊजी जेवता जेवता गणिते सांगत व माधव त्याची उत्तरे देई.
मला हे गणित येईल ?
हो ! नक्कीच !
वर्गात शिक्षकाने गणित घातले की, ते माधव तोंडीच सोडवी व उत्तर सांगायची घाई करी.
मी सोडवून दाखवतो.
कोण सोडवील ?



माधवचा मोठा भाऊ अमृतने वक्तृत्व स्पर्धेत
भाग घेतला होता. तेथे म्हणावयाचे भाषण
मोठमोठ्याने वाचून पाठ करीत असे.
सगळे परिश्रम वाया गेले
अमृत खूप आजारी पडला. त्याचे वर्गशिक्षक चिंतामग्न झाले.
काहीही तयारी नसता तू कसे भाषण देणार ?
माधवने भाषण करण्याची तयारी दर्शविली.
दादाच्या ऐवजी मी भाषण देऊ का?
माधव भाषण करू लागतो.
माधवचे अस्खलित भाषण.
शिक्षणाधिकाऱ्यांकडून शाबासकी.


एकदा संध्याकाळी माधव शाळेतून घरी येत होता. वाटेत त्याला एक मुलगा रडत बसलेला दिसला.
माधव त्या मुलाजवळ थांबला.
तू इथे का रडत बसला आहेस
मी पडलो. मला लागले.
माधवने त्याचे दप्तर उचलले. ते झटकून आपल्या खांद्यावर घेतले. त्याने त्या मुलाचे डोळे पुसले. त्याचा हात धरला व त्याला आपल्या घरी आणले.
ताई घरी होत्या. त्यांनी त्या मुलाची जखम धुतली, पुसली व औषध लावले. मुलगा हसू लागला. ताईंनी त्याला खाऊ दिला.
ताई त्याला काहीतरी खाऊ दे ग!
तो मुलगा आपले दप्तर घेऊन गेला. मग ताईने माधवजवळ त्याची चौकशी केली.
बाळ मधू, हा मुलगा कोण आहे? तुझ्या वर्गातला आहे का?
ताई तो माझ्या वर्गातला नाही की ओळखीचा नाही. तो रस्त्यात रडत बसला होता म्हणून मी त्याला आणले
शाबास मधुबाळा, असेच दुसऱ्याच्या उपयोगी पडावे.



वाचनशील माधव कथा वाचताना कथेतील पात्रांशी पटकन् समरस होत असे. सुशीलवर ओढवलेल्या संकटामुळे माधव रडत रडत स्वतःशीच म्हणतो—
अरे बापरे ! किती भयंकर !
मांडीवर बसलेल्या ताईने रडणाऱ्या माधवला कारण विचारल्यावर माधवने सुशीलवर ओढवलेल्या संकटाचे हुबेहूब वर्णन केले.
ताई, होईल का ग सुशीलची सुटका ?
होईल बर त्याची सुटका, अरे चांगल्या लोकांची काळजी परमेश्वरच घेतो.
लहान मुले कित्येकदा काही गोष्टी अकारण करीत असतात.
मधु ! काय करतोस ?
खिळा ठोकतोय.
मधूबाळा, कसा रे तू मुलगा आहेस, अरे, ही आपली धरतीमाता आहे. तिच्या शरीरात खिळा ठोकून तिला दुःख देणे तुझ्यासारख्या चांगल्या मुलाला शोभते का ?
माधवच्या मनावर धरतीमाता हे शब्द कायमचे कोरले गेले.


माधवने इंग्रजी कवितेचे मराठीत पद्यमय भाषांतर केले.
आपण आपल्या शिक्षकांना हे भाषांतर दाखवू.
मी हे भाषांतर केले ही गोष्ट खरी आहे. तुमचा विश्वास बसावा म्हणून मी तुम्ही म्हणाल त्या इंग्रजी कवितेचे मराठीत पद्यमय भाषांतर करून दाखवतो.
हे तू केलेस, यावर माझा विश्वास नाही.
शिक्षकांनी माधवला एक इंग्रजी कविता निवडून दिली.
फारच सुंदर
शिक्षकांनी ती कविता अन्य शिक्षकांना दाखवली.
माधवने अप्रतिम भाषांतर केले आहे.
माधव कविता लिहित असताना, त्याला पाहण्यातही मला मोठा आनंद वाटत होता. कवीच्या लेखन–समाधीचा नमुनाच जणू !
एखाद्या गोष्टीचा छंद घेतला म्हणजे माधव इतर सर्व गोष्टी विसरून जात असे. त्याने वर्गातील शिक्षकांकडून तुलसी रामायणाची महती ऐकली. माधवने पाच दिवसात तुलसी रामायण वाचून संपवले.
मग हनुमंताने समुद्रावरून उड्डाण केले...
पाठांतर, प्रभुत्व आणि अफाट वाचन यामुळे हा माधव पुढे प्रभावी वक्ता बनला.



माधव नित्यनियमाने सकाळी सूर्यनमस्कार घालीत असे.
ॐ मित्राय नमः
चांदा येथे शिकत असताना तेथील शिक्षकाने माधवच्या मनात व्यायामाची गोडी निर्माण केली.
एके दिवशी बरीच रात्र झाली तरी माधव घरी आला नाही.
माधव अजून कसा आला नाही
कुस्ती वगैरे पाहण्यात रमला असेल.
मधू इतका वेळ बाहेर कधी राहत नाही. शिक्षकाकडे तरी पाहून या.
मी व्यायामशाळेत जाऊन पाहून येतो.
मधू अजून आला नाही.
शाबास माधव! आज तुला शिकवलेली उडी तुला उत्तम साधली आहे. चल आता घरी.
व्यायामामुळे सुदृढ झालेले माधवचे शरीर पुढील काळात खडतर प्रसंगांना तोंड देऊ शकले.



वैनगंगेवरील नदी घाटावर विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत माधवचा प्रथम क्रमांक.
समारंभाच्या अध्यक्षस्थानी बॅ. मुलना होते.
बॅ. मुलना अचानक शाळेत. माधवकडून भाषण पुन्हा ऐकले.
फारच छान! म्हणून खास बक्षिस!
माधवचे वाचन वाढले. वाचलेल्यापैकी काही गोष्टी तो मित्रांना सांगत असे.
माधव, तू शेक्सपियरचे 'हॅम्लेट' वाचलेस का?
होतर! हॅम्लेटचे to be or not to be हे स्वगत वाचण्यासारखे आहे.
माधव फावल्या वेळात अभ्यासात कच्च्या असलेल्या मित्रांना शिकवीत असे.
मला न्यूटनचा गतीविषयक नियम नीट कळला नाही.
कॉसमॉस शब्दाचा नेमका अर्थ कोणता?
माधव शालांत परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याने शिष्यवृत्ती पटकावली.
असे कळलं का! आपल्या मधूने शिष्यवृत्ती पटकावली आहे
खरंच की काय? मधू आपल्या घराण्याचे नांव काढणार.


माधवच्या वर्गाला इंग्रजीचे शिक्षक इंग्रजी कविता शिकवत असताना त्यांचे काहीतरी चुकल्याचे माधवच्या लक्षात आले.
सर, आपण आता जो अर्थ सांगितला, तो बरोबर नाही.
मी बरोबर अर्थ सांगितलेला आहे.
माझी चूक कोणती हे कृपया सांगावे
तुला शिकायचे आहे आणि मी शिकवण्यासाठी आलो आहे, हे ध्यानात ठेव
शिक्षकांनी जो अर्थ सांगितला होता, तो त्यांनी गाईडमधून घेतला होता.
मी या वर्गात शिकणार नाही.
का शिकणार नाही ?
जो शिक्षक गाईडवरून शिकवतो त्याच्याजवळ माझी शिकण्याची इच्छा नाही
माधव वर्गातून बाहेर पडला.
माधवला शाळेच्या मुख्याध्यापकांकडून बोलावणे आले.
तू किती दिवस त्यांच्या वर्गात अनुपस्थित राहणार आहेस ?
जोपर्यंत ते हा विषय शिकवतील तोपर्यंत
मुख्याध्यापकांनी इंग्रजी शिकवणाऱ्या ज्येष्ठ शिक्षकांशी विचारविनीमय केला
एका विद्यार्थ्याने शिक्षकाला आव्हान देणे ही गोष्ट शाळेच्या दृष्टीने ठीक राहील का ?
आमच्या सहकारी शिक्षकाने लावलेला अर्थ चुकीचा आहे. चूक मान्य करण्याऐवजी क्षमा करण्यात काय अर्थ आहे ?
माधवला मुख्याध्यापकांकडून पुन्हा बोलावणे आले.
तुला एवढा कसला गर्व आहे ?
संपूर्ण प्रांतात इंग्रजी शिकवणाऱ्या ख्यातनाम शिक्षकात माझे वडील आहेत. म्हणून मला


इ.स. १९२२ मध्ये चांदा येथील ज्युबिली हायस्कूलमधून माधव मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला.
आपले सवाई माधव राव पुढील शिक्षणाविषयी काहीच कसे बोलत नाहीत ? त्यांचा विचार तरी काय आहे ?
ताईंनी माधवला विचारले. माधवने आपले मनोगत व्यक्त केले.
मॅट्रिक झाल्यानंतर लोकमान्य टिळकांनी एक वर्ष नुसता व्यायाम करून शरीर सुदृढ करून घेतले. मीही वर्षभर खूप व्यायाम करीन.
वडिलांच्या इच्छेनुसार माधवने नागपूर येथील मिशनऱ्यांच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अभ्यासक्रमात 'बायबल' हा एक विषय होता
मला वाटते, आपल्या सांगण्यात काही चूक होत आहे. बायबलात वास्तविक असे आहे....
नंतर बायबलची शुद्ध प्रत आणण्यात आली. त्यात माधवने सांगितलेला पाठ बरोबर असल्याचे दिसून आले.
शाब्बास ! तुझेच बरोबर आहे.
माधवने इंटरमिडिएटची परीक्षा दिली.
कॉपी करू नका
मी कॉपी कधीही करत नाही. माझा विषय विज्ञान, समोरच्याचा कला(आर्टस)... एकवेळ मी नापास होईन, पण कॉपी करणार नाही



माधव एंट्रन्सची परीक्षा उत्तीर्ण झाला,
इंग्रजी विषयात प्राविण्यपदक मिळाले.
त्याने काशी येथील हिंदू विद्यापीठात
(बनारस हिंदू विद्यापीठ) बी. एस्सी.च्या
वर्गात प्रवेश घेतला.
मदनमोहन मालवीय
आणि माधव
गंगेच्या किनाऱ्यावर
ध्यानमग्न माधव
माधवने भारतीय तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राजनीतीशास्त्र
इ. विषयांवरील प्रमाणभूत ग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास केला.
माधवचे योगवासिष्ठचे वाचन
माधव रामकृष्णाश्रमाकडे जात आहे.
माधव बी. एस्सी. ला असताना विषमज्वराने
४० दिवस पडून होता. माधवचे वाचन
अव्याहत चालू होते.
तापात कशाला
वाचतोस ?
ताप आपले काम करतोय,
मी माझे !
माधव बी. एस्सी. झाला.
त्याने 'प्राणिशास्त्र'
विषय घेऊन एम.एस्सी. चा
अभ्यास सुरू केला.
निकालासंबंधी
विचार न करता
परीक्षेला बसावे.
— मामा
आजारामुळे अभ्यास
झाला नाही,
परीक्षेला बसू नये
असे वाटते.
— माधव